Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by NBA NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 27/08/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या वाटच्या, आतल्या वाटच्या…

आपलं महानगर My महानगर.com

www.mymahanagar.com

## दिनविशेष

### प्रख्यात इतिहास संशोधक सेतु माधव पगडी



सेतु माधव पगडी हे इतिहास संशोधक, विचारवंत, लेखक, वक्ते, तत्त्वचिंतक, समीक्षक, इतिहासाचे भाष्यकार, कार्यक्षम मुलकी अधिकारी, प्रशासक आणि महाराष्ट्र सरकारच्या 'गॅझेटियर्स'चे संपादक व लेखक होते. माधवरावांचा जन्म २७ ऑगस्ट १९१० रोजी निलंगा, हैदराबाद राज्य (आता महाराष्ट्राचा भाग) येथे झाला. त्यांनी बनारस हिंदू विद्यापीठातून कला शाखेची पदवी आणि अलाहाबाद विद्यापीठातून मास्टर ऑफ आर्ट्सची पदवी मिळवली. शिवाजी महाराजांवर लिहिलेले यांचे संशोधित पुस्तक आजही प्रमाण मानले जाते.

इतिहासाचे संशोधक म्हणून ख्याती मिळवण्यासोबतच, सेतु माधव पगडी यांनी विपुल प्रमाणात स्फुट लेखन व ग्रंथलेखन केले. इंग्रजी, मराठी, उर्दू, फारसी, बंगाली, अरबी, तेलुगू, कन्नड अशा जवळपास सतरा भाषा त्यांना अवगत होत्या. राष्ट्रपती डॉ. राजेंदप्रसाद यांनी 'अ मोस्ट लर्नेड पर्सन' या शब्दात पगडी यांची प्रशंसा केली. मराठवाडा साहित्य परिषद, इंदूर साहित्य सभा, मराठी वाङ्मय परिषद आदी संस्थांचे अध्यक्षपद सेतु माधव पगडींनी भूषविले आहे.

महाराष्ट्र आणि मराठे, इतिहासाचा मागोवा, शिवचरित्र : एक अभ्यास, छत्रपती आणि त्यांची प्रभावळ, मराठे व निजाम, पानिपतचा संग्राम, मराठे व औरंगजेब, मोगल आणि मराठे, हिंदवी स्वराज्य आणि मोगल, छत्रपती शिवाजी (इंग्रजी ग्रंथ) अशी इतिहासाशी संबंधित त्यांची ग्रंथसंपदा आहे. याव्यतिरिक्त समर्थ संप्रदाय, भारतीय मुसलमान, वरंगलचा इतिहास, हैदराबाद स्वातंत्र्य चळवळ, काश्मीर व पाकिस्तानविषयक विचार, आदिवासी जीवन, उर्दू-गजल इत्यादी विविध विषयांवर त्यांनी लेखन केले आहे. डिसेंबर १९६९ मध्ये त्यांनी 'जीवनसेतू' नावाचे आत्मचरित्र लिहून प्रसिद्ध केले. भारत सरकारने १९९२ मध्ये त्यांना पद्मभूषण हा नागरी सन्मान प्रदान केला. अशा या प्रख्यात इतिहास संशोधकाचे १४ ऑक्टोबर १९९४ रोजी निधन झाले.

Nashik Edition

Aug 27, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401